दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.२९ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 29 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 243 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## तू गलत भी है, तू कातिल भी हैं..

# धनंजय मुंडेंनी माझी वंजारी जात बदनाम केली-शिवराज बांगर

**बीड । प्रतिनिधी**

संतोष देशमुख खून प्रकरणातला मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा उजवा हात होता. त्यामुळेच धनंजय मुंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतरही अनेक आरोप धनंजय मुंडेंवर होत आहेत. त्यामुळे ते मागच्या काही दिवसांपासून शेरोशायरीमधून व्यक्त होताना दिसून येत आहेत. त्यांचं म्हणणं आहे की, माझी वंजारी जात, माझा बीड जिल्हा काही लोकांना बदनाम केला. धनंजय मुंडे रविारी ठाण्यात वंजारी समाजाच्या मेळाव्याला हजर होते. तेव्हाही त्यांचा तोच सूर होता. त्यांच्या शेरोशायरीला बीड येथील वंचित बहुजन आघाडीचे माजी पदाधिकारी आणि वंजारा समाजाचे नेते शिवराज बांगर यांनी जशास तसं उत्तर दिलं आहे. 'तू गलत भी है.. तू कातिल भी है' अशी शायरी त्यांनी सादर केली.

**शिवराज बांगर यांची शायरी**

**तू गलत भी हैं, तू कातिल भी हैं**
**वाल्मिक की हर गुनाह में तू शामिल हैं**
**आज तुझे मील रही है क्लिन चीट**
**किस्मतवाला हैं तू आज सरकार तेरी हैं**
**सब्र कर मेरे दोस्त कल बारी हमारी हैं**

मंत्रिपद गेल्याच्या नैराश्येतून धनंजय मुंडेंनी कालचं भाषण केलं. महादेव मुंडेंना न्याय देण्याच्या



बाबतीत त्यांनी एकही शब्द काढली नाही. बापू आंधळेंची हत्या ही कुणी केली, हे धनंजय मुंडेंनी भगवानबाबांच्या समाधीवर हात ठेऊन सांगावं.. असं आवाहन शिवराज बांगर यांनी केलं. ते सोमवारी बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. धनंजय मुंडे साहेब तुमच्यामुळे वंजारी जात बदनाम झाली. तुम्ही, वाल्मिक कराड आणि तुमच्या पाच टक्के लाभार्थ्यांमुळे वंजारी समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे. माझी जात खून करत नाही, खंडण्या घेत नाही.. हे लक्षात ठेवा. त्यामुळे जातीच्या आडून दडून बसणं बंद करा.

शिवराज बांगर म्हणाले की, वाल्मिक हा कोणय? त्याची औकात काय? तो गुन्हेगार आहे? पण त्याच्यामागे जी शक्ती आहे ती धनंजय मुंडेंची आहे. धनंजय मुंडेंना हात झटकून चालणार नाही. वाल्मिकने जे केलं, ते धनंजय मुंडेंसाठी! आता एकट्या वाल्मिकवर ब्लेम टाकून चालणार नाही. शिवाय संतोष देशमुख खून प्रकरणात ४० कॉल हे धनंजय मुंडेंचे आरोपींसोबत झालेले आहेत. पूर्ण तपास होईपर्यंत धनंजय मुंडेंना क्लिनचीट मिळणार नाही. सरकार तुमचं नसतं तर ९ नंबरचा आरोपी तुम्ही असते, असा घणाघात बांगर यांनी केला.

# नागोबा गल्ली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह दुरुस्त करा-अविनाश जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

नागोबा गल्ली पेठ, बीड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा असून त्या सभागृहाची नगर पालिकेने दुरुस्ती व साफसफाई १५ वर्षापासून केलेले नसून सभागृहामध्ये दरवाजे खिडक्या व पत्र्याचे छत खराब झालेले असून त्यामुळे सभागृहामध्ये तेथे गोर गरीब लोकांच विवाह सोहळे व सांस्कृतिक कार्यक्रम करत होते.परंतु सभागृहाची दुर अवस्थता झाल्यामुळे तेथील शुभ कार्य बंद झालेली आहेत. व सभागृहाला पत्र्याचे छत असून ते खराब झाल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही. व सभागृहाच्या परिसरामध्ये अतिक्रम केलेले आहे व सभागृहाजवळ गहाण व सांडपाणी तेथे साठवत असून तेथील सभागृह



दूरअवस्था झालेली आहे. निवेदन देते प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, प्रभाकर चंदने, विलास जोगदंड,अक्षय कोकाटे, भैय्या वाघमारे, सनी जोगदंड आदि उपस्थित होते.

सभागृहामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे छत कोसळून विटंबना व नुकसान होण्याची शक्यता आहे. व तसेच पुतळ्याचे नुकसान व जिवीत हाणी झाल्यास त्यास सर्वस्वी नगर परिषद बीड जबाबदार राहील याची दक्षता घेण्यात यावी. सभागृहाची व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची दुरुस्ती न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) बीड शहर पदाधिकारी व नागरिक घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अंदोलन करण्यात येईल व काही अनुचित प्रकार घडला तर याला सर्वस्वी जबाबदार नगरपालिका प्रशासन असेल असे निवेदन रिपाई चे शहराध्यक्ष अविनाश जोगदंड यांच्यासह विशिष्ट मंडळांनी यांनी दिले आहेत.

### जात आणि धर्म विचारून गाय चोरीचा आरोप करून मारहाण झालेल्या

# रोहन पैठणकर यांची वंचितच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट!

**बुलढाणा । प्रतिनिधी**

खामगाव, जिल्हा बुलढाणा येथे रोहन पैठणकर या बौद्ध तरुणास जात आणि धर्म विचारून अमानुषपणे मारहाण करण्यात आली होती. या घटनेनंतर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक सोनोने यांनी अकोला जिल्हा रुग्णालयात जाऊन जखमी तरुण रोहन पैठणकर आणि त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

यावेळी रोहन पैठणकर यांच्या आईने सांगितले की, तुमच्या पाठीशी बाळासाहेब आंबेडकर आणि संपूर्ण वंचित बहुजन



आघाडी उभी आहे.या भेटीदरम्यान वंचित बहुजन आघाडीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते, त्यामध्ये भिमराव तायडे, मनोहर बनसोड, पराग गवई, पुरुषोत्तम अहीर, नितिन सपकाळ, वैभव खडसे, अमोल कलोरे, निलेश वाहुरवाघ, आकाश गवई, आकाश जंजाळ, सुरज दामोदर, पुरुषोत्तम वानखडे, अवधूत खडसे, गजानन सुरवाडे, आर. एन. वानखडे, कवी शामस्कर यांचा समावेश होता.

### विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास

# बळीराजाला शेती, जल व जंगल व जमिनीपासून दूर करण्याचे षडयंत्र-कॉ.एड.अजय बुरांडे

**परळी । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन करण्यापेक्षा विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास करत निसर्गाच्या सानिध्यात वावरणाऱ्या, पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनाचे बाळकडू घेतलेल्या बळीराजाला स्वतःच्या शेती, जल,जंगल आणि जमिनीपासून हुसकावून लावण्याचे षडयंत्र सत्ताधारी जन सुरक्षा विधेयकाडून करत असून या विधेयकाला शेतकऱ्यांचा देखील तीव्र विरोध होताना दिसून येत आहे. शेती, कर्जमाफी आणि पर्यावरण संवर्धन करिता तालुक्यातील नागापूर येथे सोमवार दि २८ रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व बीड जिल्हा किसान सभेकडून पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करून जन सुरक्षा विधेयकाला विरोध करण्यासाठी जोरदार निदर्शने करण्यात आली.

राज्याला संत परंपरा मोठ्या प्रमाणावर लाभलेली असून पुरोगामी विचारधारेचे



संत तुकाराम महाराज यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगातून राज्यातील शेतकऱ्यांची निसर्गाप्रति, शेती आणि जंगलप्रति असलेली वास्तविक आस्था कथन केली. स्वतःच्या कष्टातुन, रक्ताचे पाणी करून बळीराजा स्वताचा उदरनिर्वाह करत पर्यावरण संवर्धन आणि जतन करण्याचे काम पूर्वापार करत आलेला असताना भांडवली, उद्योगपतीधार्जिनी व हुकूमशाही प्रवृत्ती असलेले सत्ताधारी जन सुरक्षा विधेयकाडुन सूरजगड सारख्या ठिकाणी जंगल उद्धवस्त करत जगाचा पोशिंदा असलेल्या आदिवासी व बळीराजा याना शेती,जल, जंगल आणि जमिनीपासून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करत आहे. शेती आणि शेतकरी उध्वस्त करण्याचा कुटील डाव देशातील आणि राज्यातील सत्ताधारी करू पाहत असून विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास करत या कृत्या विरोधात आवाज करणाऱ्या निसर्ग व पर्यावरणप्रेमी यांचा आवाज दाबण्याचे आणि संविधान विरोधी जन सुरक्षा विधेयकाला आता जनसामान्यांचा रोष आणि संताप उघड उघड दिसून येत आहे असे प्रतिपादन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष्यांचे जिल्हा सचिव कॉ.एड.अजय बुरांडे यांनी केले.परळी तालुक्यातील नागापूर येथे निसर्ग संवर्धन दिनानिमित्त वृक्षारोपण व जन सुरक्षा विधेयक विरोधी निदर्शने संपन्न झाली या प्रसंगी माकपचे जिल्हा सचिव कॉ.एड.अजय बुरांडे, किसान सभेचे कॉ. मुरलीधर नागरगोजे, हनुमंत सोळंके,भगवान सोळंके,दत्ता गव्हाणे, ज्ञानेश्वर सोनटक्के,गणेश सोळंके, सिद्राम सोळंके आदींसह असंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या केज शहराध्यक्षपदी अझरोद्दीन इनामदार यांची निवड

**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) केज शहराध्यक्षपदी इनामदार अझरोद्दीन बशिरोद्दीन शेख यांची निवड दि.२८ जुलै २०२५ रोजी करण्यात आली आहे.त्यांना जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांनी नियुक्तीपत्र दिले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे,माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडे यांच्या आदेशावरून पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांनी इनामदार अझरोद्दीन यांच्यावर केज शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे.केज शहरातील लोकप्रिय नगरसेवक म्हणून इनामदार अझरोद्दीन यांची ओळख आहे. त्यांनीमागील अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व राजकीय आपला ठसा उमटविला आहे.त्यांचे युवकांचे संघटन मोठे आहे.त्यांच्या निवडीचा पक्षाला फायदा होणार असून कार्यकत्यां मध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. पक्षाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार तळागाळात पोहचवून पक्ष वाढीसाठी व सर्व सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी



प्रयत्नशील राहू,असे इनामदार अझरोद्दीन यांनी सांगितले.त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# निरा भिमा कारखाना ६ लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट-ए.आय.तंत्रज्ञानाचा ऊस पिकात वापर

**इंदापूर । प्रतिनिधी**

शहाजीनगर येथील निरा भिमा सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ या २५व्या गळीत हंगामासाठी बसविण्यात येणाऱ्या मिल रोलरचे पूजन रविवारी (दि. २७) राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि कारखान्याच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

आगामी हंगामात ६ लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून कारखान्याची यंत्रणा त्यासाठी सज्ज असल्याची माहिती भाग्यश्री पाटील यांनी दिली. शासनाच्या धोरणानुसार गळीत हंगाम वेळेत सुरू होणार असून, यासाठी काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. गेल्या २४ वर्षांपासून शेतकऱ्यांना चांगला दर देणाऱ्या निरा भिमा कारखान्यास शेतकऱ्यांनी ऊस पुरवठा करून सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

या वर्षी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात चांगल्या पावसामुळे ऊस लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. प्रतिदिन ६,५०० मे.टन ऊस गाळप क्षमतेसाठी तोडणी व वाहतूक यंत्रणा पूर्णपणे सज्ज असल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.विशेष म्हणजे, ऊस पिकात ए.आय. (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सुरू होणार आहे. यामुळे उत्पादनात वाढ, पाणी व खतांची बचत तसेच किडी-रोगांविषयी वेळेवर माहिती शेतकऱ्यांना मोबाईलवर मिळणार असल्याचे भाग्यश्री पाटील यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास उपाध्यक्ष दादासाहेब घोगरे, लालासाहेब पवार, विलासराव वाघमोडे, ॲड. कृष्णाजी यादव, दत्तू सवासे, प्रतापराव पाटील, प्रकाश मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यकारी संचालक एन.ए. सपकाळ यांनी प्रास्ताविक व स्वागत केले.



संपादकीय

# किर्तनभक्ती




काही प्रसंगात अंगावर रोमांच यावे. स्वाभाविकपणे त्याचा परिणाम श्रोत्यांवर होतो. कीर्तनकाराने लक्षात ठेवले पाहिजे की देवापर्यंत पोहोचण्याआधी देश हे ठिकाण आहे. समाजात देशभक्ती निर्माण करणारी छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज, देशाकरिता हौतात्म्य पत्करले.

सगुण निर्गुण कीर्तन भक्ती डॉ. जगदीश करमळकर श्रवणभक्ती नंतर कीर्तन भक्ती सांगितली आहे. आपण एखादा चित्रपट पाहिला किंवा एखादे चांगले पुस्तक वाचले तर आपल्याला त्या चित्रपट किंवा पुस्तकाबद्दल काही चांगले वा वाईट सांगावेसे वाटते म्हणून मला असे वाटते श्रवणानंतर कीर्तन भक्ती घेतली असावी. कीर्तनामध्ये व्याख्यान, प्रवचन, भजन, भजनी निरुपण हे सर्व प्रकार गृहीत धरावे लागतील. महर्षी नारद हे कीर्तनभक्तीचे आदर्श आहेत. भगवंताला कीर्तन विशेष आवडते असे समर्थ रामदास स्वामी महाराज म्हणतात म्हणोनि कीर्तनाचा अगाध महिमा। कीर्तने संतोषे परमात्मा । सकळ तीर्थे र्आणि जगदात्मा ।हरी कीर्तनी वसे। श्रवण, कीर्तन ही बहिरंग साधना आहे पण ती सामुदायिक असल्याने अतीव आनंद देते, कीर्तनात टाळ, पखवाज एका ठेक्यात वाजू लागले की नकळत श्रोता ही टाळी वाजवू लागतो व डोलायला लागतो व झटकन भगवन्नामाशी एकरूप होतो व काही काळ का होईना त्याचे स्थळ काळाचे भान सुटते व भजनाचा, नामाचा निखळ आनंद मिळतो.

मनातल्या मनात तो भगवंताभोवती फेर धरून नाचू लागतो. वारकरी कीर्तनात कीर्तनकार व टाळकरी नाचू लागले की एक वेगळाच आनंद चैतन्य निर्माण होते आणि मग आपल्याला नामदेव महाराज म्हणतात ते पटते नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी। कीर्तन हे समाज प्रबोधनाचे मोठे साधन आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात जनसामान्यांचे मनात देशभक्तीचे जागरण करण्याच काम कीर्तनातूनच झाले. कीर्तन ही एक कला आहे किंबहुना नारदीय कीर्तन हा एकपात्री प्रयोग आहे. यासाठी कीर्तनकार अतिशय तयारीचा असावा लागतो तरच तो श्रोत्यांना २ तास खिळवून ठेऊ शकतो. कीर्तनकाराने संत. पंत व अगदी तंत वाङ्मयाचा अभ्यास केला पाहिजे. स्वतः तो कवी असावा. तो चांगला गायक, व वक्ता असला पाहिजे. त्याने कीर्तनात शांत , करुण, वीर, अद्भूत या रसांचा वापर करावा अगदी शृंगाररसही कीर्तनात असावा पण जेवणात जेवढे मिठाचे प्रमाण असावे काही प्रसंगात अंगावर रोमांच यावे. स्वाभाविकपणे त्याचा परिणाम श्रोत्यांवर होतो. कीर्तनकाराने लक्षात ठेवले पाहिजे की देवापर्यंत पोहोचण्याआधी देश हे ठिकाण आहे. समाजात देशभक्ती निर्माण करणारी छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज, देशाकरिता हौतात्म्य पत्करले. अशा क्रांतिकारकांची चरित्रे त्याने सांगितली पाहिजे. हे सर्व करीत असताना श्रोत्यांना कंटाळा येत नाही ना? हे ही पाहिले पाहिजे .मधून मधून विनोदाची पखरण करावी. कीर्तनकाराने काही पथ्ये कटाक्षाने पाळली पाहिजेत समाजात द्वेष निर्माण होईल, तसेच संत, सज्जनाचा, महापुरुषांचा अपमान होईल अशी विधाने करू नये. कीर्तनकाराचे चरित्र व चारित्र्य शुद्ध व निर्मळ असावे. त्याच्या करनी व कथनीत एक वाक्यता असावी. कीर्तनकाराचा कीर्तन हा धंदा असू नये ते त्याचे जीवन ध्येय असावे. या कीर्तनातून परमेश्वराबद्दल गोडी, आवड निर्माण होते व त्यातूनच नामस्मरण भक्तीचा प्रारंभ होतो.

# संवादाची खिडकी...

प्रत्यक्ष आत्महत्या करणे असो किंवा तसे करण्याचा प्रयत्न करणे असो, सोशल मीडियाच्या प्रतिक्रियांना मनावर घेऊन जीवघेणे पाऊल उचलणे असो किंवा कुणालाच आपल्या मनातले कळू न देता सतत आतल्या आत घुसमटत राहून सोशल मीडियावर आयक्वीट म्हणत स्वतःचे आयुष्य संपवणे असो... अशा हादरवून टाकणाऱ्या आणि नेमके कुठे चुकले असा विचार करायला लावणाऱ्या घटना आजूबाजूला घडतात तेव्हा सगळ्यांत आधी डोळ्यासमोर उभे राहते, ते दिवसागणिक वाढत जाणारे विसंवादाचे चित्र!शांत डोक्याने विचार केला, तर लक्षात येईल, की अस्वस्थ करणाऱ्या अशा अनेक घटनांमागे एक समान धागा जोडला गेला आहे. तो म्हणजे, दिवसेंदिवस दुर्मीळ होत चाललेला व्यक्ती-व्यक्तीतील संवाद. आज काल तंत्रज्ञानाची कवाडे मोठी होत आहेत, तसतशी संवादाची खिडकी मात्र छोटी होते आहे. पूर्वी घरातली व्यक्ती बाहेर जाणार म्हटले, की घरातील सगळ्यांना ती व्यक्ती कुठे, कधी आणि कशी चालली आहे, याची संपूर्ण माहिती असायची; पण आता कुणाला कुठे चालला आहात, असा साधा प्रश्न विचारला, तरी त्या व्यक्तीची 'स्पेस' म्हणा किंवा खासगी बाब क्षणात संपते आणि प्रश्न विचारण्यांवर 'भोचक' असे 'लेबल' लागते.मोबाइल नव्हता तेव्हा घराघरांत वाद-संवाद मुक्तपणे घडायचा, हे कुणीही नाकारणार नाही. आत्तासारखे मी कुठे जातो/जाते, काय करते/करतो हे विचारायचा कुणालाही अधिकार नाही. 'मी माझे आयुष्य माझ्या नियम व अटींवर जगण्यास समर्थ आहे,' असा 'मी'पणाचा टेंभा मिरवणारे त्या वेळी क्वचितच होते. तेव्हा आपण काय करतो,



आपले सध्या काय सुरू आहे याबद्दल घरी सांगण्यात आणि त्याबद्दल चर्चा करण्यात घरातील कोणत्याच वयोगटाच्या सदस्याला कमीपणा वाटत नसे; कारण त्या वेळी नात्यांचा पाया हा प्रामुख्याने 'आर्टिफिशिल इंटेलिजन्स'वर नसून 'इमोशनल इंटेलिजन्स'वर उभा होता. म्हणूनच भावना, व्यक्ती-व्यक्तीमधला वाद-संवाद यांना त्या वेळी आत्ताच्या मानाने जास्त प्राधान्य होते.आपल्या अवतीभोवती पाहायला गेलो, तर माणसं एकमेकांशी संवाद साधत आहेत; पण फक्त त्या संवादाच्या 'कॅन्व्हास'चे रूप मात्र आता बदलले आहे. आज कुटुंब 'ऑनलाइन' जास्त भेटतात. तंत्रज्ञानाने जवळीक साधली असली, तरी प्रत्यक्ष संवादाचे धागे काही अंशी उसवल्याचे सांगता येईल. एखाद्याशी संवाद साधणे म्हणजे त्याचे /तिचे फोटो लाइक करणे, त्यावर काही तरी कमेंट करणे, आपल्या एखाद्या 'स्टोरी'मध्ये समोरच्या व्यक्तीला 'टॅग' करणे आणि अगदीच त्या व्यक्तीची जास्त आठवण आली, तर एक वेळ ठरवून त्या व्यक्तीला व्हिडिओ कॉल करणे, एवढीच काय ती संवादाची व्याख्या आता राहिली आहे.मुळात मनुष्य हा विविध स्वभावाच्या व्यक्तींमध्ये रमणारा प्राणी. मात्र, तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे तो आता प्रत्यक्षात कमी आणि 'व्हर्च्युअली' इतरांना जास्त भेटताना दिसत आहे; त्यामुळे एखाद्याच्या वाढदिवसाला आवर्जून फोन करून शुभेच्छा देणे, एखादीच्या घरी विनाकारण सहज चहा प्यायला जाणे, कोणत्याही कारणाशिवाय केवळ आठवण आली म्हणून मित्र/मैत्रिणीला भेटणे, आजीच्या हातचे गरमागरम पोहे खाणे, आजोबांसोबत बागेत चक्कर मारणे, आई-बाबांसोबत फिरायला जाणे यांसारख्या सहज शक्य असणाऱ्या खुल्या क्षणांसाठी तर ही संवादाची खिडकी मात्र जणू आता बंदच झाली आहे.खरं तर, प्रत्यक्षात शक्य असूनही काही जण एकमेकांना फक्त 'ऑनलाइन'च जोडायचा प्रयत्न करत असतील, तर याचा अर्थ बाकी कुणी नाही; पण आपणच आपल्या संवादाच्या खिडकीला मर्यादा घालत आहोत, हे लक्षात घ्या. रोजची धावपळ, रुटीन आणि वेळेअभावी ऑनलाइन भेटीगाठी काही वेळा सोयीच्या वाटत असतील; परंतु जे अनुभव विविध व्यक्तींना प्रत्यक्ष भेटल्यावर येतात, त्या अनुभवांची शिदोरी ही आठवणींच्या रूपात सदैव आपल्या सोबत राहते. एक मात्र नक्की म्हणता येईल, की भविष्यात रोबो, टेक्नोलॉजी, चॅट जीपीटी यांसारखे अजून कितीही आधुनिक शोध लागले, तरी दोन व्यक्तींमधल्या प्रत्यक्ष संवादाची जागा यातले कोणतेच माध्यम कधीही घेऊ शकणार नाही.सध्या भलेही 'व्हर्च्युअल' गोष्टींची चलती असेल, तरीही आपल्या जवळचे, हक्काचे, आपल्याला आणि आपल्या समस्यांना समजून घेणारे, कधी केवळ निर्हेतुक मनमोकळ्या गप्पा मारणारे असे कुणी तरी प्रत्यक्ष भेटण्यात एक वेगळाच आनंद असतो. अशा व्यक्तींमुळे आपली संवादाची खिडकी मोठी होण्यासाठी नकळत मदत मिळू शकेल, ज्यांच्यासोबत आपल्याला कोणतेही वाईट पाऊल उचलण्यापेक्षा मन मोकळे करत आपल्या समस्येवर बोलता येणे अधिक सोपे होईल. एक व्यक्ती म्हणून आपल्याला घडवण्यात भविष्यात अशा माणसांचा मोलाचा वाटा असेल असे नक्कीच म्हणता येईल.

# भावंडांमधील मत्सराची गोष्ट

स्वरा आई-वडिलांच्या खूप मागे लागली होती. तिच्या इतर मित्र-मैत्रिणींचं पाहून आपल्यालाही छोटा भाऊ किंवा बहिण असावेत असं सारखं ती पालकांना म्हणायची. आई-वडिलांनाही वाटलं, की काही दिवस म्हणेल, पुन्हा तिला समजेल व शांत होईल. स्वरा मात्र ऐकायला तयारच नव्हती. 'मला कुणीच पार्टनर नाही, माझ्यासोबत खेळायला कुणी नाही,' अशी तिची सतत कुरकुर सुरू असायची. मग पालकांनी विचार केला, की दुसरं मूल होऊ द्यायला काय हरकत आहे? स्वरामध्येही काही सकारात्मक बदल दिसतील म्हणून त्यांनी मूल होऊ द्यायचा निर्णय घेतला आणि त्यांना दुसरा मुलगा झाला.

त्यानंतर काही दिवस स्वरा खूप खूश होती; पण पुढच्या सहा-सात महिन्यांतच तिचा उत्साह मावळला. खेळकर स्वरा एकदम बदलली. अचानकपणे तिचा स्वभाव रागीट व्हायला लागला. छोट्या-छोट्या गोष्टींवरून चिडणं, खेळण्यांची मोडतोड आणि खाली आलेला 'अकॅडेमिक परफॉर्मन्स' तिचं काही तरी बिनसलंय हे सांगत होता; पण आई-बाबांना नेमकं काय झालंय हे नीटसं कळतं नव्हतं. शांतपणे बसून विचारलं तेव्हा तिनं आईला सांगितलं, की तुम्हा दोघांचं माझ्याकडे लक्षच नाही. तुम्हाला मी आता आवडतच नाही. आई तिला समजवायची; पण पण त्यातून फारसं काही बदललं नाही. एके दिवशी आई दुसऱ्या कामात असताना बाळ अचानक रडायला लागलं. आई पळतंच तिथं आली तेव्हा स्वरा त्याच्याकडे बोट दाखवून हसत होती. आईनं विचारल्यावर, त्याला मांडीला चिमटा काढल्याचं तिनं सांगितलं. आई चिडली आणि स्वराला एक धपाटा दिला. त्यामुळे दुखावलेली स्वरा मात्र आणखी चिडली.तू असं का केलंस? आणि अशी का वागतेस, असं आईनं दरडावल्यावर 'तुमचं कुणाचंही माझ्यावर प्रेम नाही. मी खूप छान आहे; पण हा आल्यापासून तुम्ही सगळे बदलला आहात. आई तू तर माझ्या शेजारी झोपतही नाही. सारखं त्याला जवळ घेऊन बसते. मी कोणालाच आवडत नाही, तुम्ही कोणीच माझ्याशी आता खेळतही नाही,' असं म्हणून ती हमसून हमसून रडू लागली. नंतर मग आईला प्रकरण फार गंभीर झालंय याची कल्पना आली. तिचं असं उद्धट वागणं, उलट बोलणं, स्वभावात झालेला बदल आणि इजा पोहोचवण्यामुळे ती आतून किती एकटी पडली आहे आणि स्वतःला किती असुरक्षित समजते याची तिला चांगलीच जाणीव झाली.आपल्यापैकी बऱ्याच घरांमध्ये अशी परिस्थिती असतेच असते. आपण ती पाहतो आणि अनुभवतोसुद्धा. घरात एक मूल असताना दुसऱ्या अपत्याचा जन्म झाला, की जसं अत्यंत आनंददायी वातावरण असतं, तसंच त्यात महत्त्वाचा भाग



असतो, तो म्हणजे पहिल्या मुलाची मानसिकता जपण्याचा. मोठ्या अपत्याच्या मनात लहान भावंडाविषयी आकस तयार होणे ही स्वाभाविक गोष्ट आहे; पण तो त्याच्या मनातून काढून टाकणं हेही तितकंच जिकीरीचं काम आहे. यासाठी वेळोवेळी संवाद साधण्याची आणि त्यांना समजून घेण्याची तयारी पालकांची असायला हवी.बऱ्याचदा आपण बघतो, की अगदी मोठे झाल्यावरही काही भावंडांमध्ये हा आकस असतो, ईर्षा असते. मला वाटतं, त्याची पाळंमुळं ही त्यांच्या बालपणातच असतात; कारण आई-वडिलांचं सर्व मुलांवर प्रेम सारखंच असतं. मात्र, काही वेळा कमकुवत किंवा अतिशय हुशार असलेल्या आपल्या अपत्यावर तुलनेनं जास्त लक्ष असतं; त्यामुळे इतर अपत्यांना डावलल्याचं वाटू शकतं आणि असं वाटणं हे खरोखरच घातक आहे.दुसरी गोष्ट, म्हणजे दोन अपत्यांमधील अंतर खूप कमी किंवा अगदी जास्त असते, तेव्हा त्या दोघांमधील बंध चांगल्या रीतीने निर्माण होतात. मात्र, 'तुलना' ही अशी एक गोष्ट आहे, ज्यामुळे ईर्षा मनात घर करून राहते. कधी कधी घरातच मजेमजेने 'कोण लाडका' ही चर्चाही होत राहते. त्यावरूनही मुले दुखावली जाऊ शकतात. तीनपेक्षा जास्त अपत्य सध्याच्या परिस्थितीत क्वचितच असतात; त्यामुळे दोन अपत्यात तुलना होते, तेव्हा 'हा' विरुद्ध 'तो' अशीच परिस्थिती बनते आणि त्यामुळेही दोघांची मनं विभागतात.अजून एका गोष्टीचा विचार व्हायला हवा, तो म्हणजे हल्ली दोन अपत्त्यांमध्ये वयाचं अंतर चार ते पाच वर्षांपेक्षा जास्त असते; त्यामुळे दुसरे भावंड आल्यावर पहिले मूल हे बऱ्यापैकी मोठे आणि समजदार झालेले असते. ते अगदीच नकळते नसतात; पण दुसरे येणारे मूल हे पालकांच्या आयुष्यात बदल घेऊन येतात; तसंच मोठ्या अपत्त्याच्या आयुष्यातही खूप बदल घडवतात. कारण साधारण सहा ते सात वर्षांची मुलं समजूतदार झालेली असली, तरी दुसरं भावंड येण्याआधी सर्व जग हे त्याच्या भोवतीच फिरत होतं. दुसऱ्या भावंडाच्या येण्यामुळे आई-वडिलांच्या प्रेमात, त्यांच्या वेळ देण्यात दुसरा भागीदार किंवा वाटेकरी आल्याने मुलांना ते सहन होत नाही. परिणामी, त्यांची चिडचिड सुरू होते. 'आता माझे आई-वडील 'माझे' राहिले नाहीत,' या विचाराने मग ते असे काही वागतात, की ज्यामुळे पालकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले जाईल.स्वराच्या केसमध्ये आईने तिच्याकडे लक्ष द्यावे आणि तिच्या भावालाही शिक्षा मिळावी या दोन्ही हेतूने तिने त्याला इजा पोहोचवली असावी. लहान मुलांच्या हे लक्षात येत नाही, की असं करण्यानं पालकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधलं जात असलं, तरी त्यांची कृतीही त्यांच्याबद्दलची नकारात्मकता दर्शवते. त्यांना हे कळतंच नाही, की अशा गोष्टी या त्यांच्यासाठी घातक आहेत. मग हे बदलायचं कसं आणि या समस्या टाळायच्या कशा ते मात्र नक्की पालकांच्या हातात आहे.

पालकांच्या हातात सारं काही...

१. सर्वांत प्रथम, जेव्हा नवीन बाळ कुटुंबात येणार असते, तेव्हापासूनच त्या दोघांचे बाँडिंग भक्कम करण्याचा प्रयत्न आई-बाबांनी केल्यास पहिल्यापासूनच दोघांमधील मत्सर किंवा ईर्षा कमी होईल. घरात आपल्याव्यतिरिक्त इतरही कुणी तरी येणार आहे, याची जाणीव पालकांनी दोघांनाही द्यायला हवी.

२. बऱ्याचदा मोठं मूल परिस्थितीनुसार लहान भावंड आल्यावर अगदी जबाबदारीनं वागायला सुरुवात करतात; पण प्रत्येक मोठं मूल हे सारखं नसतं; त्यामुळे मोठ्या अपत्त्यास दुसऱ्या अपत्त्याची चाहूल लागल्यापासूनच नात्यात सहभागी करून घेतलं, मोठं भावंड म्हणून जबाबदारी दिली, तर त्याच्यातील समजूतदारपणा वाढेल. जसं, की तान्ह्या भावंडांशी गप्पा मारणं, गाणी म्हणून त्याला खेळवणं इत्यादी. मोठ्या अपत्त्याला याची जाणीव करून द्यायला हवी, 'सध्या सगळे त्याच्या भावंडाभोवती असतात; कारण त्याला त्याची गरज आहे. जेव्हा तुला ती गरज होती, तेव्हा तुलाही सर्वांनी असेच केलेले होते.' हा संवाद उत्तमरीत्या साधला गेला, तर मूल मानसिकदृष्ट्या भावंडाला स्वीकारायला तयार होईल.

३. दुसरी गोष्ट म्हणजे, परिस्थितीमुळे किंवा शारीरिक-मानसिक ओढाताणीमुळे आपली कितीही चिडचिड वा त्रागा झाला, तरी तो मोठ्या मुलासमोर न काढता संयम ठेवायला हवा.

४. अजून महत्त्वाची गोष्ट म्हणजे, प्रत्येक वेळी मोठ्या अपत्त्याच्या चुकाच न दाखवता त्याच्या सकारात्मक बाजूंचाही विचार व्हायला. जसे, की तू बाळाला किती छान गाणं म्हणून दाखवतो, तू असताना बाळ किती छान हसते, बाळाला तू किती छान पाहतोस, कधी कधी काळजी घेतोस इत्यादी. त्यामुळे त्यालाही आपलं काही तरी दुसऱ्याला आवडतं आहे हे समजतं.

५. पुढची अतिशय परिणामकारक गोष्ट म्हणजे, दिवसातील ठरावीक वेळ ही फक्त मोठ्या अपत्यासोबत पालकांनी घालवायला हवी. तो ठरलेला वेळ इतर कुणाशीही (अगदी बाळाशीही) शेअर न करता फक्त मोठ्या अपत्यासाठी राखून ठेवायला हवा, जेणेकरून त्यालाही आपण महत्त्वाचे आणि आवडीचे आहोत याची जाणीव होईल.

६. आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यावर आपल्याच मुलांशी अंतर वाढल्याचे अनुभव पालकांना बऱ्याचदा येतात. यात वावगं काहीच नाही. कारण परिस्थिती, स्वभाव आणि वेळेनुसार नात्यात दुरावा येतो. नकळतपणे चुका होतात; पण सर्वांत महत्त्वाचे हे आहे, की त्यावर उपाय शोधून त्या सुधारणं; तसंच पालक आणि 'आई-बाबा' होण्याचं सर्वांत प्रथम सुख ज्यांनी दिलं, ते 'मोठं अपत्य' यामध्ये हे प्रेमाचं नातं पुन्हा पहिल्यासारखं घट्ट होणं.एकूणच, मोठ्या मुलामध्ये असलेला मत्सर व ईर्षा ही असुरक्षितपणातून आलेली असते. त्यात निरागसतेची भावनाही असते. ती पालकांनी दुर्लक्ष करून चालणार नाही. ही निरागसता जपून, दोन्ही भावडांमध्ये सख्य निर्माण करणं हे पालकांच्याच हातात असतं.

# सागरी साहचर्य

सागरातल्या जलचरांच्या जीवनप्रणालीत मोठे वैविध्य आढळते. यापैकी काही प्रजातींमध्ये असलेले आपुलकीचे साहचर्य तर फार विस्मयकारक आहे! अशा प्रकारच्या सहजीवनात (सिम्बायोसिस) दोन भिन्न प्रजातींचे प्राणी एकाच जागेत भागिदारीत राहतात.

सागरातल्या जलचरांच्या जीवनप्रणालीत मोठे वैविध्य आढळते. यापैकी काही प्रजातींमध्ये असलेले आपुलकीचे साहचर्य तर फार विस्मयकारक आहे! अशा प्रकारच्या सहजीवनात (सिम्बायोसिस) दोन भिन्न प्रजातींचे प्राणी एकाच जागेत भागिदारीत राहतात. एक जण दुसऱ्याला अन्न मिळवायला मदत करतो; तर कधी दुसऱ्याचे वाहन बनून त्याची वाहतूक करतो. एखाद्या शिकारी प्राण्याचा हल्ला झाल्यास मित्राला सावध करून त्याचे संरक्षण करतो, लपायला मदत करतो.

प्राण्यांतील सहजीवनाचे उत्तम उदाहरण म्हणजे निळे चमकदार पट्टे, मजबूत दात असलेले रेसेस मासे. सफाई कामगाराप्रमाणे हा मासा मोठ्या माशांच्या दातांमध्ये आणि जबड्यांमध्ये अडकलेले परजीवी,



मृत पेशी आणि त्या माशांच्या त्वचेवर चिकटलेले नको असलेले पदार्थ वेचून काढतो, त्यावर ताव मारतो. त्यामुळे या छोट्या माशांना 'क्लीनर रेसेस' असेच नाव पडले आहे! या क्लीनर माशांची प्रवाळ भित्तिकांजवळ वस्ती असते. भूक लागली की, ते नृत्य केल्याप्रमाणे ठराविक हालचाल करून दर्शवतात की, आता सफाई केंद्र उघडले आहे, आता मोठ्या माशांनो या, रांग लावा! मग पोपटमासे आणि शार्क तिथे येऊन आपला जबडा वासून रांगेत थांबतात. पुढे क्लीनर मासा एकेकाच्या तोंडात शिरतो, सफाई करून त्यावर भोजन करतो! अशी 'स्वच्छता केंद्रे' पॅसिफिक आणि हिंदी महासागरात मोठ्या संख्येने आहेत.सागरी सहजीवनाचे आणखी एक उदाहरण म्हणजे रेमोरा मासे आणि बार्नाकल. हे दोघे जलचर हरित कासव आणि शार्क या दोघा मोठ्या प्राण्यांचा उपयोग चक्क वाहनाप्रमाणे करतात. रेमोरा आणि बार्नाकल या दोघांच्या कासव आणि शार्कच्या पाठीवर आपली पकड मजबूत करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. रेमोराचे पुढचे कल्ले कासव आणि शार्कची पाठ पकडून ठेवतात, तर बार्नाकल हे आपल्या लाळेतून एक चिकट द्रव शार्क आणि कासवाच्या पाठीवर सोडतो. त्यामुळे तो पाठीवर पक्का बसू शकतो. हे सर्व असते ते भक्ष्य शोधायला जाताना पोहोण्याचे श्रम वाचविण्यासाठी! पण हे सहजीवन एकतर्फी नसते. बदल्यामध्ये या मोठ्या वाहन प्राण्यांच्या पाठीवर चिकटलेल्या असंख्य त्रासदायक जिवाणूंना छोटे रेमोरा मासे खातात आणि स्वच्छ करतात, कासव आणि शार्कना ताजेतवाने करतात.

# मीडिया ट्रायल केली, समाज बदनाम केला;पण आम्ही अजूनही संयमी-हेच विरोधकांच्या जळजळीचं कारण!

## ज्यांनी जातीचा आरोप केला, त्यांना माणुसकीचं उत्तर-मुंडेंच्या भाषणाची राज्यात चर्चा

**वडवणी । लोकपत्रकार भांगे**

राजकारण आणि समाजकारणातील संघर्षांवर संयमाने मात करत, कुठल्याही टीकेला शांततेने उत्तर देण्याची भूमिका घेणारे राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी ठाणे येथे झालेल्या वंजारी समाजाच्या अधिवेशनात उपस्थितांपुढे अत्यंत भावनिक भाषण करत विरोधकांना अप्रत्यक्ष टोले लगावले.

मी राजकारणात सक्रिय झाल्यापासून अनेक संकटांना सामोरे गेलो आहे. गेल्या २०० दिवसांत माझ्यावर सलग मीडिया ट्रायल सुरू होती. त्या माध्यमातून माझ्या आईवडिलांपासून माझ्या समाजापर्यंत, माझ्या जिल्ह्यापर्यंत सगळ्यांची बदनामी करण्यात आली. मात्र आम्ही संयम सोडला नाही. आमच्यावर जातीय द्वेषाने टीका केली गेली, आरोप झाले, पण आम्ही कोणाचाही द्वेष केला नाही, आणि करणारही नाही, असे ते म्हणाले.मुंडेंनी आपल्या भाषणात स्व. गोपीनाथराव मुंडे आणि स्व. पंडित अण्णांच्या कार्याची आठवण करून दिली. याच अधिवेशनात बीड जिल्ह्यातील वंजारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मोहन आगाव सर यांचाही सन्मान करण्यात आला.मुंडेंनी भाषणात शेरोशायरीच्या माध्यमातून टीकाकारांना उत्तर दिले. वादळ कितीही मोठं असलं, तरी वटवृक्ष हलत नाही, अशा शब्दांत त्यांनी स्वतःच्या भूमिकेवर ठामपणा दर्शवला.

या अधिवेशनात मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाला सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.धनंजय मुंडेंच्या भाषणाची चर्चा आता राज्यभर सुरू झाली असून, राजकीय वर्तुळातही या भाषणाकडे विशेष लक्ष दिलं जात आहे.



# पंचायत समिती वरोरा येथे मोफत पाठ्यपुस्तक योजनेचा बोजवारा

## ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

## आमदार करण देवतळे यांना शिक्षक संघटनेचे निवेदन

**वरोरा । प्रतिनिधी**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना राज्य शासनातर्फे मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जातात. मात्र मागील दोन-तीन वर्षांपासून वरोरा पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद शाळांमध्ये या पाठ्यपुस्तकांचा पुरवठा अपुरा होत आहे. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



दरवर्षी प्रत्येक शाळेतून विद्यार्थ्यांची पटसंख्या शासनाकडे पाठवली जाते. त्या अनुषंगाने पाठ्यपुस्तक संच मिळणे अपेक्षित असते; मात्र प्रत्यक्षात १०० टक्के विद्यार्थ्यांना पुस्तकांचा पुरवठा होत नाही. केवळ ७५ टक्के विद्यार्थ्यांपर्यंतच पुस्तके पोहोचतात. उर्वरित विद्यार्थ्यांना वर्षभर पुस्तकाविना शिक्षण घ्यावे लागते, ही गंभीर बाब आहे.

पाठ्यपुस्तकांच्या तुटवड्याबाबत गट साधन केंद्रातील साधन व्यक्तींना विचारणा केली असता, जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावरूनच कमी संच मिळतात, अशी उडवा-उडवीची उत्तरे दिली जातात, असा आरोप शिक्षक संघटनेने केला आहे. ज्या शाळांना पुस्तके कमी मिळतात त्या शाळांचे मुख्याध्यापक वाढीव पुस्तकांसाठी केंद्रप्रमुखामार्फत पुन्हा पटसंख्या पाठवतात; मात्र त्याचा काहीही उपयोग होत नाही, असेही संघटनेने सांगितले.ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शेतकरी, कष्टकरी आणि गोरगरीब कुटुंबातील असल्याने आधीच जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या घटलेली आहे. पाठ्यपुस्तकांच्या अभावामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अधिकच वाढत आहे. या गंभीर समस्येबाबत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा वरोरा तर्फे वरोरा-भद्रावती विधानसभा मतदारसंघाचे आमदार करण देवतळे यांना निवेदन देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर आवाज उठवू, अशी ग्वाही आमदार देवतळे यांनी दिली. या वेळी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील बुरीले, तालुका अध्यक्ष अशोक टिपले, तालुका सचिव विजय सातपुते, कोषाध्यक्ष गजानन कहुरके, तालुका संघटक अनिल थेरे आणि मार्गदर्शक विनोद भोयर उपस्थित होते.

# खडसेंना ट्रॅपची माहिती होती तर जावयांना अलर्ट करायचे ना

## काही झाले की हे दुसऱ्यावर ढकलतात-गिरीश महाजन

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मला पुण्यातील रेव्ह पार्टीबद्दल काही माहिती नव्हते. पण अनेक फोन आल्याने मी बातम्या पाहिल्यावर मला लक्षात आले की आमचे नेते नाथाभाऊ यांचे जावई हे एका रेव्ह पार्टीमध्ये पकडले गेले आहेत. त्यांनीच ह्या पार्टीचे आयोजन केल्याची माहिती देखील मला मिळाली, असे म्हणत मंत्री गिरीश महाजन यांनी रेव्ह पार्टी प्रतिक्रिया दिली आहे.



गिरीश महाजन पुढे बोलताना म्हणाले की, या रेव्ह पार्टीमध्ये दारु, हुक्का आणि ड्रग्ज मोठ्या प्रमाणात मिळून आले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी एकनाथ खडसे यांच्या जावयांना ताब्यात घेतल्याचे मी बातम्यामध्ये पाहिले आहे. या प्रकरणी मी काही माहिती अजून घेतलेली नाही.

गिरीश महाजन म्हणाले की, कालच एकनाथ खडसे यांनी माध्यमांसमोर बोलताना म्हटले की, चाळीस गावला इतके ड्रग्ज का मिळतात. इथेच का ड्रग्ज सापडतात असा सवाल केला होता. खडसे नेहमी ड्रग्ज विरोधात बोलत असतात पण आता त्यांचे जावईच सर्व उद्योग चालवत आहे, हे आज समोर आले आहे. हा विषय थोडा तपासाचा आहे, नेमके काय झाले हे आताच सांगता येणार नाही. पोलिस या संदर्भात चर्चा करत असतीलच. तपासानंतर सर्व काही समोर येईलच.गिरीश महाजन म्हणाले की, रेव्ह पार्टीमध्ये किती जण होते याबद्दल मला काही माहिती मिळाली नाही. या प्रकरणी तपास केल्यावरच कोण पळाले का? नाही हे समोर येईल. एकनाथ खडसेंना जर ट्रॅप माहिती होते तर त्यांनी जावईबापूंना कल्पना देण्याची गरज होती, असे होण्याची शक्यता आहे असे म्हणत सांभाळून राहण्याचा सल्ला त्यांनी द्यायला हवा होता. प्रत्येक वेळी तुमच्या संदर्भातच कसे षड्यंत्र असते. काहीही झाले तरी लोकांना दोष द्यायचा हे चुकीचे आहे. खेवलकर यांना तिथे कुणी बळजबरीने ते नेऊन बसवले नसेल ना. या प्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

# माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त धामणगाव रेल्वे तालुका व शहर शाखेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.धामणगाव रेल्वे येथील माताजी मंदिरात महाआरती करून देवीसमोर नतमस्तक होऊन उद्धवसाहेब ठाकरे यांच्या उदंड, निरोगी आणि दीर्घायुष्याची प्रार्थना करण्यात आली. यानंतर वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला तसेच शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन रुग्णांना फळवाटप करून त्यांची सेवा करण्यात आली.



या उपक्रमांना अमरावती जिल्हाप्रमुख मनोज कडू, तालुका प्रमुख नाना देऊळकर, शहर प्रमुख गोपाल मोकलकर, तालुका संघटक निलेश मुंदाने, शहर संघटक डॉ. अशोक कुचेरिया, उपतालुका प्रमुख सुरेश जुनघरे व दीपक कुंमरे, उपशहर प्रमुख संतोष गावंडे व रवी काटणकर, विभाग प्रमुख नंदू डुकरे व अतुल चौधरी, माजी युवासेना तालुकाप्रमुख आशिष गावंडे, तसेच धर्मेंद्र क्षीरसागर, मनीष गोपाळ, स्वप्नील कोंबे, हरीश पनपालीया, राहुल ठाकरे, प्रशांत शिंदे, अंकुश वानखेडे, मधुर पालीवाल, प्रतीक ढोमणे, सागर गुल्हाने, निखिल कपिले आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# ओसाड स्मशानभूमीतून हरितक्रांतीकडे देगांवच्या तरुणांचा प्रेरणादायी उपक्रम

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील देगांव गावातील तरुणांनी एक अद्वितीय आणि समाजप्रबोधन करणारा उपक्रम राबवला आहे. गावातील ओसाड पडलेल्या स्मशानभूमीला हरित बनवण्याचा संकल्प त्यांनी केला आणि आज त्याचे फलित प्रत्यक्ष कृतीतून दिसत आहे. गावातील एकतेचे आणि सामाजिक जाणिवेचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे.




कुणी आर्थिक मदत केली, कुणी झाडं आणली, कुणी खड्डे खणले, कुणी पाणी आणले संपूर्ण गावातील तरुणांनी एकजुटीने स्मशानभूमीत वृक्षारोपण केले. स्मशानभूमी असो वा जीवनभूमी, आम्ही हरितक्रांती घडवणारच! असा जोशपूर्ण एल्गार देगांवच्या तरुणांनी दिला.

निसर्गाशी नातं जोपासणारा आणि पुढच्या पिढ्यांसाठी हिरवळ उभी करणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास्पद ठरत आहे. मृत्यूला विसाव्याचे स्थान असलेल्या ठिकाणी जीवनाची हिरवळ रुजवण्याचे कार्य या तरुणांनी हाती घेतले आहे. त्यांच्या या सामाजिक भान आणि पर्यावरणपूरक कामगिरीमुळे देगांवने संपूर्ण समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.अशा उपक्रमांमुळेच खऱ्या अर्थाने गावं बदलत आहेत आणि निसर्ग पुन्हा सजीव होत आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या बळकटीकरणांसाठी निधी उपलब्ध करून देणार-उपमुख्यमंत्री अजित पवार

**शिर्डी । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रणा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. यासाठी शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिली.राहुरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या शेतकरी भवन व उपहारगृहाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला आमदार काशीनाथ दाते, माजी आमदार लहू कानडे, कैलास पाटील, डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक ॲड. केरू पानसरे, बाजार समितीचे सभापती अरुणराव तनपुरे, हर्ष तनपुरे, राजेंद्र नागवडे, अशोक सावंत, कपिल पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, कृषी उत्पन्न बाजार समित्या या शेतकरी व समाजाच्या मालकीच्या संस्था असून, त्या नफ्यात व काटकसरीने कशा चालतील, याचा विचार आवश्यक आहे. शासनाने कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर शेतीमध्ये वाढवण्यासाठी ५०० कोटींची तरतूद केली आहे. कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उसाचे उत्पादन वाढविण्याचा विचार शेतकऱ्यांनी करावा. शेतीमध्ये फळबाग लागवड, तीन पिकांनंतर ऊसाच्या बियाण्यात बदल, आणि शाश्वत पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. नवीन पिढीने पर्यावरणपूरक व कचरामुक्त शहर उभारण्यास पुढाकार घ्यावा.

शासनाने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महाराष्ट्रासाठी २० लाख घरे मंजूर केली असून या घरांच्या बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. लाडकी बहिण योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ४५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, या योजनेचा लाभ केवळ अडीच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील बहीणींनाच मिळणार आहे; नोकरदार कुटुंबांतील सदस्यांनी या योजनेचा लाभ घेऊ नये, असेही आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.श्री.पवार म्हणाले, राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज पुरविण्यासाठी २० हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंत पीक कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, शेतकरी कल्याणाच्या विविध योजनांसाठी दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करून पाच वर्षांत एकूण २५ हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. दिव्यांग लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत दिले जाणारे मासिक मानधन दीड हजार रुपयांवरून वाढवून आता अडीच हजार रुपये करण्यात आले आहे. कांद्याच्या खरेदीसाठी नाफेडच्या माध्यमातून शासन कटिबद्ध असून त्यासाठीही आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे. राज्याच्या उत्पन्नाच्या मर्यादेत शासनास कर्ज घेण्याची मुभा असून, देशातील एकूण जीएसटीपैकी महाराष्ट्राचा वाटा १६ टक्के आहे. यातील ५० टक्के म्हणजे ८ टक्के जीएसटीचा वाटा राज्य शासनास प्राप्त होतो.




केंद्र शासनाने पुणे - अहिल्यानगर नवीन रेल्वे मार्गास मंजुरी दिली असून, भूसंपादन प्रक्रियेद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार असून, त्यांना योग्य मोबदला देण्यात येईल. या मार्गामुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होणार आहे. शिर्डी विमानतळावर नाईट लँडिंग सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे. याठिकाणी सुसज्ज टर्मिनलसाठीही मंजुरी मिळालेली असून, आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांद्वारे देश-विदेशातील भाविक शिर्डीत येऊ शकणार आहेत. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.राहूरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कामकाजाचे कौतूक करतांना उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, राज्यातील उत्कृष्ट पहिल्या दहा कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राहुरी बाजार समितीचा समावेश असून, लवकरच वाबूरी येथे १५ एकर जागेत अद्ययावत जिनिंग मिल सुरू करण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या प्रारंभी बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी सांगितले की, शेतकरी भवन व उपहारगृह इमारतीचे बांधकाम १ कोटी ८० लाख रुपये खर्चून करण्यात आले असून, समितीकडे १९ कोटी रुपयांचे ठेवी आहेत.

# लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळी गावामध्ये भव्य वृक्षारोपण समारोह संपन्न

## प्रत्येक घरी एक फळ झाड भाजपा युवा नेते सुरज भैय्या घुले यांचा उपक्रम

## ५०० फळ झाड वृक्षारोपण करून ना.पंकजाताईचा टाकळी येथे वाढदिवस साजरा

**केज । प्रतिनिधी**

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसनिमित्त सामाजिक उपक्रम दि.२८ जुले २०२५ रोजी राबविण्यात आला.मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व फराळ हाउपक्रम राबवत केज तालुक्यातील टाकळी येथील भारतीय जनता पंक्षाचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांच्या वतीने प्रत्येक घरी एक फळ झाड या वृक्षांची लागवड करण्यात आली.टाकळी या गावात सुरज भैय्या घुले यांच्या वतीने ५०० फळ झाड वृक्षारोपणाचा उद्देश पूर्ण करून ना.पंकजाताईचा वाढदिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा,इन्फंट इंडियाचे सर्वेसर्वा दत्ताजी बारगजे,ज्येष्ठ नेते सुनील गलांडे,ज्येष्ठ नेते रामकृष्ण काका घुले,भाजपा तालुकाध्यक्ष भगवान केदार,चेअरमन रघुनाथजी बारगजे यांची उपस्थिती होती.तसेच या वृक्ष लागवडी वेळी दगडू दळवे, रघुनाथ दादा बारगजे,व्यंकट आप्पा बारगजे, गोरख अण्णा बारगजे,जीवन बारगजे, केशवजी राख,बाबासाहेब घुले,परमेश्वर घुले, नवनाथ घुले,राजाभाऊ घुले,विठ्ठल दादा घुले, नामदेव घुले,चांगदेव घुले,लक्ष्मीकांत पाळवदे, विठ्ठल बारगजे सर,अभिमान घुले,शुभम बारगजे,सुरज बालाजी घुले,सोमनाथ घुले, रामेश्वर घुले,अशोक घुले,अंगद घुले,आदित्य बारगजे व इतर गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर या कार्यक्रमाचे आयोजक सुरज रामकृष्ण घुले,विष्णू राख,श्रीराम घुले,प्रकाश बारगजे यांच्या वतीने करण्यात आले होते.



# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी रंजीत घाडगे यांची निवड

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील ढाकेफळ येथील रहिवाशी एस.जी.वन.न्यूज चे संपादक पत्रकार रंजित घाडगे यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या बिड जिल्हाध्यक्ष पदी निवड झाली आहे. रंजित घाडगे यांची निवड राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाळासाहेब अडागळे , व राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशानुसार करण्यात आली.



या निवडी दरम्यान राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी यांनी असे मत व्यक्त केले की पत्रकार रंजित घाडगे हे गेल्या अनेक वर्षापासून पुरोगामी पत्रकार संघात चांगल्या पद्धतीने काम करत आहेत संघाचे संघटन,दिशा,धोरण,ध्येय समाजकार्य,या सर्व गोष्टीशी निगडित राहून काम करतात.त्यांच्या कामाची धडपड पाहून आम्ही त्यांना पुरोगामी पत्रकार संघाचे बिड जिल्हा अध्यक्षपद दिले असल्याचे त्यांनी सांगितले. रंजित घाडगे यांची निवड झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील पुरोगामी पत्रकार संघाला नवीन तरुण अभ्यासू जिल्हाध्यक्ष मिळाले असे पत्रकार वर्गातून बोलले जात आहे.राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यामुळे रंजित घाडगे यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेछ्याचा वर्षाव होत आहे.

## वकील संघ उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे

# सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत एक दिवसीय प्रादेशिक गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम संपन्न

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

दिनांक २५ जुलै २०२५ रोजी वकील संघ उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मार्फत एक दिवसीय प्रादेशिक गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम वकील संघाच्या वतीने घेण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन वकीलसंघाच्या अध्यक्षा अड.सौ.योगिता क्षीरसागर (थोरात) मॅडम,उपाध्यक्ष अड. एस.एन.मोरमपल्ले

सचिव अड.श्रीकृष्ण चौधरी सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून सी.डी.एस.एल.आय.पी.एफ अधिकारी स्नेहल पलांडे यांनी उपस्थित विधीज्ञ यांना




आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विधीज्ञ यांना सेबी तसेच सी.डी. एस.एल.चीकार्यप्रणाली विशद केली तसेचबचत व बचतीचे महत्त्व समजावून सांगितले. डिमॅट अकाउंट,शेअर मार्केट,म्युच्युअल फंड व आनलाईन फ्राड पासुन सावधगिरी बाळगावी यासाठी मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना सर्वांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विधीज्ञ मंडळी यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन, नियोजन केले.या कार्यक्रमास जेष्ठ विधीज्ञ व्हि.डी.सोळंके

मा.अध्यक्ष बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अण्ड गोवा वरीष्ठविधीज्ञ व्हि.डी.सपकाळ साहेब आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सेबीचे सेक्युरीटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी यांनी केले.

# वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला जाण्यात राजकारण पाहणे योग्य नाही

## उद्धव ठाकरेंच्या भेटीवर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया

**नागपूर (वृत्तसंस्था)**–शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन त्यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. यावर अनेकांच्या प्रतिक्रिया येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील पत्रकारांनी विचारले असता, ते म्हणाले की यात राजकीय का पाहता? आमच्याही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा आहेत. शुभेच्छा द्यायला जाणे, यात राजकारण पाहणे योग्य नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.महाराष्ट्राच्या मनात काय असा प्रश्न पत्रकारांनी देवेंद्र फडणवीस यांना विचारला, ते म्हणाले, महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसले आहे. आता महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल. मात्र, काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातले आहे असे म्हणणे योग्य नाही. असे म्हणत त्यांनी ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीवर भाष्य केले आहे.



पुण्यातील रेव्ह पार्टीत पोलिसांनी रविवारी पहाटे धाड टाकली. या कारवाईत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांचा जावई प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. यावर मुख्यमंत्री म्हणाले, मी पण ही माहिती माध्यमातून घेतली आहे, कारण मी सकाळपासून विविध कार्यक्रमांमध्ये फिरतो आहे. त्यामुळे मला ब्रीफिंग घेता आलेलं नाही. मात्र, जे माध्यमात दिसलं त्याप्रमाणे पुणे पोलिसांनी एका रेव पार्टीवर कारवाई केली आहे. त्यामध्ये काही लोक सापडले आहे. त्यामध्ये काही ड्रग्स वगैरे सापडले आहेत. पोलिस अधिकाऱ्यांकडून पूर्ण ब्रीफिंग घेतल्यानंतर यावर बोलू शकेल. मात्र प्राथमिकदृष्ट्या असा प्रकारचा गुन्हा त्या ठिकाणी घडल्याचा दिसून येत आहे.मंत्री संजय शिरसाट आणि माधुरी मिसाळ यांच्यात बैठकांच्या मुद्द्यावरून झालेल्या पत्रव्यवहाराबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, असे पत्र लिहून कोणीही वाद निर्माण करू नये. मंत्र्यांनी आपापसात बोलावे आणि मंत्र्यांना काही अडचण असतील तर त्यांनी मला येऊन सांगावे. त्यातील अडचण दूर करता येईल. मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही शासनाचे भाग आहेत. सर्व अधिकार मंत्र्यांकडे असतात. मंत्री जे अधिकार देतात ते राज्यमंत्र्यांचे अधिकार असतात. यात कुठलीही संशय नाही. मात्र, राज्यमंत्र्यांना बैठका घेण्याचा अधिकार नाही असे मानाने चुकीचे आहे.

# कर्जमाफी केल्यानंतर शेतकरी कर्ज फेडत नाहीत, बँका बुडतात

## हसन मुश्रीफांच्या वक्तव्याने नवे वादंग निर्माण होण्याची शक्यता

**कागल (वृत्तसंस्था)**–राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात महत्त्वाचे विधान केले. मी पुढेमागे कधी मुख्यमंत्री झालो, तर प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना सध्याच्या अनुदानाच्या दुप्पट रक्कम देईन, असे ते म्हणालेत. सोबतच शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्यानंतर ते कर्ज फेडत नाहीत. त्यामुळे बँका बुडतात, असेही मुश्रीफ म्हणालेत. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यात नवे वादंग निर्माण शक्यता आहे.



कागल तालुक्यातील वंदूर येथे एका कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात बोलताना हसन मुश्रीफ यांनी शेतकरी कर्जमाफीसंदर्भात भाष्य केले. लाडकी बहीण योजनेमुळे सध्या राज्य सरकारसमोर आर्थिक अडचणी उभ्या ठाकल्या आहेत. लाडक्या बहिणींसाठी सुमारे ४६ हजार कोटींचा खर्च करावा लागत आहे. काही पुरुषांनीही या योजनेचा गैरफायदा घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी लांबणीवर जात आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मंत्री मुश्रीफ यांनी कर्जमाफीबाबत आपली स्पष्ट भूमिका मांडताना म्हटले की, कर्जमाफीबाबत माझे मत वेगळे आहे. कर्जमाफी करणार म्हटले की, शेतकरी कर्ज भरत नाहीत. वारंवार कर्जमाफी जाहीर केल्यास शेतकरी कर्ज फेडण्यास टाळाटाळ करतात, आणि परिणामी सहकारी बँका व पतसंस्था अडचणीत येतात. बच्चू कडू यांच्या आंदोलनामुळे सहकारी पतसंस्थांचे तब्बल ३८ हजार कोटी रुपये थकीत आहेत, असे ऐकण्यात आले आहे, असे उदाहरण देत त्यांनी चिंता व्यक्त केली. प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना आपण दुप्पट पैसे दिले पाहिजेत. म्हणजे शेतकऱ्यांना पैसे भरायची सवय लागेल. नाहीतर नुसती कर्जमाफी करत राहिले तर थकबाकीमुळे बँका बुडून जातील. पुढेमागे तुम्ही कधी मला या राज्याचा मुख्यमंत्री केले तर मी प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दुप्पट अनुदान देईन, असेही हसन मुश्रीफ म्हणालेत.

# दिवा मुंबई लोकल बाबत रेल्वे प्रशासनाने भूमिका स्पष्ट मांडावी अन्यथा परिणामांना रेल्वे प्रशासन जबाबदार–सौ.अश्विनी केंद्रे

**ठाणे । प्रतिनिधी**

दिवा ते मुंबई लोकल बाबत २०१४ पासूनची मागणी आहे. आत्ता पर्यंत शेकडो निष्पाप लोकांचे जीव गेले तरीही रेल्वे प्रशासन लोकल फेऱ्या वाढवण्या बाबत, दिवा ते सीएसएमटी लोकल चालू करण्याबाबत, दिवा हे जंक्शन असूनही सर्व फास्ट लोकल दिवा येथे थांबवण्यात याव्यात. ९ जून रोजी दुर्दैवी दुर्घटना घडली होती गर्दी नसती तर लोकल मध्ये जागा असती तर दरवाजातील नागरिक एक मेकांना धडकले नसते. त्यांचे जीव गेले नसते. दुर्दैवाची बाब म्हणजे दुर्घटना घडल्यावर तेथे म्ब्युलन्स व्यवस्था नव्हती त्यामुळे टेम्पो मध्ये अपघात झालेल्या नागरिकांना घेऊन हॉस्पिटल मध्ये जावे लागले. रेल्वे प्रशासनाने प्रत्येक रेल्वे स्टेशन वर स्वतःची म्ब्युलन्स व्यवस्था करायला हवी. दिवा ते उडचढ लोकल सेवा सुरू करण्यासाठी अनेक वेळा निवेदन दिले. स्वाक्षरी मोहीम घेऊन हजारो प्रवाशांनी स्वाक्षरी केलेले निवेदन दिले. २१ मार्च २०२३ मध्ये मोर्चा काढला. १६ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २०२५ मध्ये सात दिवस अमोल धनराज केंद्रे यांनी आमरण उपोषण केले. त्यावेळी होणार आहे असे सांगितले. फास्ट लोकल बाबत निर्णय घेऊन १९ लोकल थांबवण्यात आल्या परंतु कसारा, कर्जत, खोपोली या फास्ट लोकल थांबवणे पेक्षा कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ वरून फास्ट लोकल सोडून त्या दिवा येथे थांबवल्या तर नक्कीच याचा फायदा दिवा येथील जनतेला होणार आहे. त्याही नंतर २२ डिसेंबर २०२४ मध्ये रेल्वे प्रशासनास जाग येण्यासाठी दिवा येथे ढोल बजाव आंदोलन करण्यात आले.आशा होती की जून मध्ये तरी दिवा ते उडचढ लोकल सेवा सुरू होईल परंतु सुरू झाली नाही. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. २०१४ पासूनची जनतेची मागणी असूनही रेल्वे प्रशासनास दिरंगाई का करत आहे. विद्याविहार, घाटकोपर वरून लोकल सुटते दिवा हे जंक्शन असूनही लोकल सुटत का नाही. माता भगिनी वडीलधारे प्रवासी बांधवाचे विद्यार्थ्यांचे जीव वाचवण्यासाठी लोकशाही मार्गाने सौ अश्विनी अमोल केंद्रे १ जुलै पासून दिवा स्टेशन बाहेर लक्षवेधी धरणे आंदोलन करत असून रेल्वे प्रशासनाने २५ दिवस झाले तरी दखल का घेतली नाही. म्हणून २० जुलै रोजी अमोल केंद्रे यांनी जनतेच्या सोबत एल्गार मोर्चा काढला. दोन दिवसात दखल घेतली नाही तर रेल रोको करणार असल्याचे सांगितल्या नंतर रेल्वे प्रशासनास जाग आली २२ आणि २३ जुलै रोजी रेल्वे प्रशासनाचे अधिकारी भेटण्यासाठी आले. त्यावेळी आले. पावसामुळे मंडपाची सहनशीलता संपली पण माझी नाही हे धरणे आंदोलन सुरूच राहणार वेळ पडली तर आमरण उपोषणास सुरुवात करेल. आम्ही सामान्य आहोत आमच्या समस्या तुम्ही समजून घ्या असे अधिकाऱ्यांना स्पष्ट सांगितले.रेल्वे प्रशासनाच्या विनंती वरून दिनांक २४ जुलै रोजी मध्य रेल्वे प्रबंधक यांच्या सोबत शिष्टमंडळाची नियोजित बैठक पार पडली त्यामध्ये दिवा ते उडचढ लोकल चालू होणार आहे पण वेळ सांगता येणार नाही. सकाळच्या वेळी ७ ते ११ दरम्यान लोकल वाढवणे, दिवा जंक्शन असल्याने सर्व फास्ट लोकल थांबवणे बाबत रेल्वे प्रशासनाने सर्व नाही परंतु कल्याण , डोंबिवली व इतर ठिकाणच्या फास्ट लोकल थांबवने , दिवा पनवेल लोकल बाबत तसेच मुंब्रा, दिवा स्टेशन तसेच ज्या ज्या रेल्वे स्टेशन वर म्ब्युलन्स नाही येथे २४ तास म्ब्युलन्स सेवा चालू करण्यात येईल असे सकारात्मक उत्तर दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077